-: महाराष्ट्र शासन :-

**उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई**

कार्यालय - मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई ४०० ००१

Email ID - gnwardmumbai@gmail.com


जा.क्र.मुंबई/उपनि/जी-एन/बी-१/ना-हरकत दाखला/७८७/२०२५ दिनांक -०७/०८/२०२५

प्रति,
चेअरमन/ सेक्रेटरी,
रामकुटीर को.ऑप.हौ.सो.लि.
प्लॉट नं.१३३-बी,माहीम बाझारसमोर,
पोस्ट ऑफिस,एल.जे.रोड,माहीम,मुंबई-४०००१६

**विषय :- संस्थेच्या पुनर्विकासास ना हरकत देणेबाबत.**

**संदर्भ :-** १) सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सगृयो/२०१८/प्र.क्र.८५/१४-स दिनांक ०४/०७/२०१९
२) आपलेकडील दिनांक १९/०७/२०२५ रोजीचे पत्र व त्यासोबतचा प्रस्ताव.
३) या कार्यालयाचे आदेश जा.क्र.मुंबई/उपनि/जी-एन/बी-१/कलम ७६/७०६/२०२५ दि.२१/०७/२०२५
४) आपला दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सादर केलेला इतिवृत्त व पेनड्राईव्ह.
५) प्राधिकृत अधिकारी यांचा दिनांक ०६/०८/२०२५ रोजीचा निरीक्षण अहवाल.

२/ संस्थेने संदर्भ क्रमांक २ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे संस्थेच्या पुनर्विकासाच्या विकासक निवडीसाठीच्या दिनांक ०३/०८/२०२५ रोजी विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित राहण्यासाठी या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ३ चे आदेशान्वये या कार्यालयातील श्रीमती स्वाती सावंत, सहकारी अधिकारी श्रेणी- १ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी सभेस उपस्थित राहून सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने निरीक्षण अहवाल संदर्भ क्रमांक ५ अन्वये या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर सभेस एकूण ४१ सभासदांपैकी ३४ सभासद प्रत्यक्ष उपस्थित होते. एकूण ३४ सभासदांपैकी ३४ सभासदांनी Sugee Developers Private Limited या विकासकाची निवड केलेली आहे. तसेच प्राधिकृत अधिकारी यांच्या अहवालानुसार संस्थेने पुनर्विकासाबाबत ठराव मंजूर केलेला असून मंजूर ठरावानुसार संस्थेने Sugee Developers Private Limited या विकासकाची निवड केलेली आहे. (सोबत निरीक्षण अहवाल जोडला आहे.) संस्थेच्या पुनर्विकासाबाबत शासन निर्णय दि. ०४/०७/२०१९ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तींची संस्थेने पूर्तता केलेली असून त्यामधील तरतुदीस अधिन राहून खालील नमूद अटीसह या कार्यालयाचे नाहरकत पत्र देण्यात येत आहे.

१. सदर पुर्नविकास प्रक्रियेबाबत घेतलेल्या निर्णयास समिती पदाधिकारी व्यक्तिश:व सामुदायिकरित्या जबाबदार राहतील.
२. पुनर्विकास प्रक्रिये संदर्भात सक्षम प्राधिकरणाकडील आदेश संस्थेवर बंधनकारक राहतील.
३. संस्थेने पुनर्विकासाबाबत कामकाज शासनाचे दिनांक ०४/०७/२०१९ चे आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे अनुपालन करुन करावयाचे आहे.

उप निबंधक सहकारी संस्था, (जी-एन) विभाग मुंबई

( विजयसिंह गवळी )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई

ठिकाण - मुंबई
दिनांक -०७/०८/२०२५
प्रत माहितीसाठी -

१. Sugee Developers Private Limited
२.मा.कार्यकारी अभियंता, जी/एन-विभाग, इमारत प्रस्ताव कक्ष, मुंबई शहर.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई

# निरीक्षण अहवाल

रामकुटीर को. ऑप. हौ.सो.लि. प्लॉट नं.१३३ - बी, माहीम बाझारसमोर,पोस्ट ऑफिस, एल. जे. रोड, माहीम, मुंबई-४०००१६ या संस्थेने दिनांक ०३/०८/२०२५ रोजी अधिमंडळाची विशेष बैठक म्हणजेच विशेष सर्वसाधारण सभा बोलावली होती. सदर सभेत संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकास प्रक्रीये संदर्भात विषय घेण्यात येणार होता. सदर सभेसाठी मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई यांचे कार्यालयाकडील दिनांक २१/०७/२०२५ रोजीचे आदेशान्वये माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने रामकुटीर को.ऑप.हौ.सो.लि.,प्लॉट नं.१३३-बी,माहीम बाझारसमोर,पोस्ट ऑफिस, एल.जे.रोड, माहीम, मुंबई-४०००१६ या संस्थेने मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई यांचे कार्यालयाकडील दिनांक २१/०७/२०२५ रोजीच्या आदेशान्वये विशेष सर्वसाधारण सभा दिनांक ०३/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात आयोजित केली होती. सदर सभेस एकूण ४१ सभासदांपैकी ३४ सभासद प्रत्यक्षरित्या उपस्थित राहीले. सभेसाठी गणपूर्ती झाल्याने संस्थेच्या सभेस सुरुवात करणेत आली.

सभेचे अध्यक्षस्थान श्री. भिमराव मंडलिक यांनी स्विकारले. त्यावर सर्व उपस्थित सभासदांनी आक्षेप न घेतल्याने ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे.

तदनंतर श्रीमती स्वाती सावंत, प्राधिकृत अधिकारी, (सहकारी अधिकारी श्रेणी-१) उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, यांनी सभेची रुपरेषा समजावून सभा ज्या विषयांसाठी बोलाविण्यात आली आहे, त्या बाबींवर चर्चा करुन सभा शांततेत पार पाडण्याबाबत आव्हान करुन सभेची कार्यवाही पुढे चालू करण्यात आली.

**विषय क्रमांक १. संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासाबाबतची माहिती देणे.**

**ठराव क्रमांक १-** सभेचे सचिव श्री. उदय लोंढे यांनी इमारतीच्या पुर्नविकासाबाबतची माहीती संस्थेच्या प्रत्यक्षरित्या उपस्थित ३४ सभासदांना समजावून सांगितली. ३४ सभासदांपैकी ३४ सभासदांनी **Sugee Developers Private Limited** यांना संमती दर्शविली. त्यावर संस्थेमधील ३४ सभासदांनी सर्वानुमते सहमती दर्शविली. संस्थेच्या पुर्नविकासाबाबतची माहीती व इतर बाबी यांची माहीती सभासदांना समजल्याबाबत खात्री करुन घेतली तसेच कोणाला काही बोलायचे असल्यास अथवा काही शंका असल्यास विचारणा केली त्यावर संस्थेच्या एकाही सभासदानें प्रश्न अथवा हरकती उपस्थित केलेली नाही.

**विषय क्रमांक २- संस्थेच्या इमारतीच्या विकासासाठी विकासक नियुक्ती करणे.**

**ठराव क्रमांक २-** पुर्नविकास समिती सदस्य यांनी संस्थेच्या सभासदांना विश्वासात घेवून तसेच त्यांचेबरोबर चर्चा करुन पुर्नविकास समिती सदस्य यांनी **Sugee Developers Private Limited** या विकासकाची निवड करण्याकरिता उपस्थित सभासदांची लेखी संमतीपत्राव्दारे संमती दर्शविण्याबाबत सुचविले असता संस्थेच्या ३४ सभासदांपैकी ३४ सभासदांनी **Sugee Developers Private Limited** या विकासकाची संमती दर्शवली. त्याबाबतचे लेखी संमतीपत्र घेणेत आले तसेच चलचित्रीकरण करण्यात आले.

**Sugee Developers Private Limited** या विकासकाने संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकास करावा असा ठराव करणेबाबत संस्थेचे सभासद Dr.P.Ambardekar यांनी सुचविले व त्यास Mr.S.Gupte यांनी अनुमोदन दिले.

यावर सर्वानुमते ठराव करण्यात आला की, **Sugee Developers Private Limited** या विकासकाने संस्थेच्या इमारतीचा पुर्नविकास करावा असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सूचक** - Dr.P.Ambardekar
**अनुमोदन-** Mr.S.Gupte

**विषय क्रमांक ३ विकासक निवडीची लेखी संमतीपत्र घेणे.**

सभेचे सचिव श्री. उदय लोंढे यांनी उपस्थित सर्व सभासदांना कळविले की, विषय क्रमांक २ अन्वये सर्वानुमते झालेल्या ठरावानुसार संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासाकरीता **Sugee Developers Private Limited** यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे नांवे संमतीपत्रे लेखी स्वरुपात देण्यात यावी तसेच त्यांचे चलचित्रीकरण करण्यात येणार आहे. त्यास उपस्थित सर्व सभासदांनी सहमती दर्शविली.

वरिल प्रमाणे सभेचे विषयांवर चर्चा करून त्या बाबत आवश्यक तो ठराव पारित करण्यात आला आहे. विषय पत्रिकेवर अन्य विषय नसल्याने अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सदरहू विशेष सर्वसाधारण सभेचे, सभेच्या सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत छायाचित्रीकरण करण्यात आले.

सोबत - १.संमती पत्राची प्रत.
२.उपस्थित सभासदांची हजेरी
३.विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त
४.पेन ड्राईव्ह

( स्वाती सावंत )
प्राधिकृत अधिकारी तथा
सहकारी अधिकारी श्रेणी -१ अधिन
उपनिबंधक, सहकारी संस्था,
जी/एन विभाग, मुंबई.

**दिनांक** - ०६/०८/२०२५
ठिकाण - मुंबई